# भेदाभेद हा धार्मिक नव्हे, सामाजिक दोष

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

## सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन

भेदाभेद दूर करण्यासाठी सुरुवातीच्या काळापासून प्रयत्न झाले. समरसता निर्माण करण्यासाठी देशातील अनेक थोर पुरुषांनी पुढाकार घेतला. हा दोष धर्मातून आला नसून सामाजिक आहे. आधुनिक काळातही हे दोष दूर करण्यासाठी प्रयत्न झाले. धर्म बदलून ही समस्या सुटत नसल्याचेही दिसून आल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

धरमपेठ येथील आर. एस. मुंडले धरमपेठ कला वाणिज्य महाविद्यालयात शुक्रवारी मनोरमाबाई मुंडले स्मृती व्याख्यानमालेंतर्गत आंबेकर यांचे 'समरस भारत-संकल्पना आणि निर्माण' या विषयावर व्याख्यान झाले. याच कार्यक्रमात भंडारा येथील भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेला सामाजिक सेवा शिल्पी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. उल्हास औरंगाबादकर, उपाध्यक्ष ॲड. संजीव देशपांडे, कार्यकारिणी सदस्य डॉ. कुमार शास्त्री, सचिव रत्नाकर केकतपुरे आदी उपस्थित होते.

न्यायाचे राज्य निर्माण व्हावे यासाठी सर्वांनी एकत्र येऊन राष्ट्राचा विचार करण्याची गरज आहे. चारित्र्यवान राष्ट्रच दुरगामी टिकू शकते. प्रत्येक समाजात दोष निर्माण होतात. हे दोष दूर करण्यासाठी प्रयत्न होतात की नाही हे महत्त्वाचे आहे. आपल्या देशातील



**भंडारा येथील भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेला सामाजिक सेवा शिल्पी पुरस्कार प्रदान करताना सुनील आंबेकर. यावेळी ॲड. उल्हास औरंगाबादकर, रत्नाकर केकतपुरे, डॉ. कुमार शास्त्री, ॲड. संजीव देशपांडे उपस्थित होते.**

संत परंपरेतूनही भेदाभेदाच्या विरोधात आवाज उठवून एकतेचा संदेश देण्यात आला. महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक अशा अनेक थोर पुरुषांनीही समरसतेसाठी मोठे योगदान दिले. समाज जिवंत असल्याचे हे लक्षण असल्याचे आंबेकर म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता तांबोळी यांनी केले. आभार रत्नाकर केकतपुरे यांनी मानले.

आरक्षणामुळे सकारात्मक परिणाम

भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून वंचित घटकांचा मुख्य प्रवाहात समावेश करण्यात आला ही नक्कीच कौतुकास्पद बाब आहे. हा प्रवास अद्याप संपला नसून यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज आहे. समरसता केवळ कायद्याने होऊ शकत नाही तर त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. आरक्षणामुळे सकारात्मक परिणाम झाला. आपल्या देशात झालेले असे तातडीचे प्रयत्न इतर देशात मात्र होताना दिसले नसल्याचे आंबेकर म्हणाले. जन्म-मृत्यूचे पुरावे नसल्याने आम्हाला जात प्रमाणपत्र मिळत नव्हते. भटके विमुक्त कल्याणकारी संस्थेच्या पुढाकाराने साडेतीन हजार लोकांना लाभ मिळू शकला. इतर योजनांसाठीही असाच पुढाकार घेण्यात आल्याचे समाधान संस्थेचे जिल्हाप्रमुख शिवा कांबळे यांनी व्यक्त केले. संस्थेच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारी चित्रफितही यावेळी दाखविण्यात आली.

Scanned with CamScann